BEED ▪ Year-4 ▪ Issue-243 ▪ Wednesday 30 April 2025 ▪ Postal Date 01 May, 2025 ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ Pages 4 ▪ Price 2

सायं.दैनिक
आवाज जनसामान्यांचा..
बीड किसान
• संपादक : शेख कामरान •
बीड जिल्हा
Epaper : www.beedkisan.in

# राष्ट्रवादीच्या रथयात्रेचे बीडमध्ये स्वागत

## संयुक्त महाराष्ट्र राज्याच्या ६५ वर्ष पूर्ती निमित्त आयोजन







**बीड । किसान न्युज**

गौरवशाली महाराष्ट्र महोत्सव २०२५ निमित्ताने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आयोजित रथयात्रेचे बीडमध्ये आज बुधवारी १ वाजता जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. संयुक्त महाराष्ट्र स्थापनेला ६५ वर्षे पूर्ण होत असल्याने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाच्या वतीने राज्यात गौरवशाली महाराष्ट्र महोत्सव २०२५ अंतर्गत गडकिल्ले माती व नद्यांचे जल-कुंभ रथयात्रा काढण्यात आली. या गौरव रथयात्रेच्या माध्यमातून राज्याच्या निर्मितीत योगदान देणाऱ्या महाविभूतींचा परिचय नव्या पिढीसमोर येणार आहे. इतिहासाला उजाळा देण्याचा प्रयत्न सुरू आहे. ही यात्रा पूर्ण राज्यात जाणार असून आज बुधवारी (दि.३०) दुपारी १ वाजता शहरातील शिवतीर्थ छत्रपति शिवाजी महाराज चौकात पोहोचली होती. यावेळी स्वागत करताना यात्रेचे मराठवाडा समन्वयक आमदार विक्रम काळे, राष्ट्रवादी सेवादलाचे राज्य कार्याध्यक्ष शिवाजी बनकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर, ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, जिल्हाध्यक्ष ॲड.राजेश्वर चव्हाण, शेख निजाम, हारून इनामदार, फारूक पटेल, बळीराम गवते, नगराध्यक्ष सीता बनसोड, बाजीराव धर्माधिकारी, रेखा फड, प्रज्ञा खोसरे, इक्बाल सय्यद, प्रिया डोईफोडे यांच्यासह राज्य, जिल्हा पातळीवरील आजी-माजी पदाधिकारी उपस्थित होते.

# स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका लागत नसल्याने कार्यकर्ते मरगळले

## राजकारण सोडून लागले आपल्या वैयक्तिक कामाला

### गावांच्या विकासावर कोणीच बोलेना; नेत्यांचीही झाली गोची






**बीड । किसान न्युज**

स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती यांच्या निवडणुका गेल्या अनेक वर्षापासून होत नसल्याने, सगळयाच राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांना मरगळ आली आहे. किती दिवस वाट बघायची अशी परिस्थिती कार्यकर्त्यांची झाली असून, ते आता राजकारणाचा नाद सोडून स्वतःच्या वैयक्तिक व्यवसायाला लागले असल्याचे दिसत आहे. दुसरीकडे यामुळे गावांच्या विविध प्रश्नावर कोणी बोलताना दिसत नाही. या सगळ्या प्रकारामध्ये नेत्यांची ही गोची होताना दिसत आहे. बीड जिल्ह्यासारख्या मागास जिल्ह्यामध्ये राजकारण हा करिअरचा विषय ठरत आहे. राजकारणात जाऊन करियर करणे म्हणजे पैसा कमावणे असा सर्व सरळ अर्थ घेतला जातो. एखाद्या नेत्याचे किंवा पक्षाचे काम करायचे आणि त्याच्याकडून जिल्हा परिषदेत, पंचायत समिती नाहीतर नगरपालिका निवडणूक लढवायची, असे सगळे नियोजन कार्यकर्ते करीत असतात. ती निवडणूक

» पान २ वर




# मनोज जरांगेचा पुन्हा सरकारला 'अल्टिमेट'

## ...तर २९ ऑगस्टला मुंबईत धडकणार



**जालना । किसान न्युज**

मराठा आरक्षणासाठी लढणारे नेते मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला पुन्हा अल्टिमेट दिले असून दि. २८ ऑगस्टपर्यंत त्यांच्या प्रमुख मागण्या मान्य न झाल्यास २९ ऑगस्ट रोजी मुंबईत धडकणार असून येथे आमरण उपोषण सुरू करणार आहे. यासोबतच, अंतरवाली सराटीत चालू असलेले उपोषणही कायम राहणार आहे. मराठा-कुणबी एक असल्याचा आद्यादेश त्वरित काढावा, ५८ लाख नोंदींच्या आधारे तत्काळ प्रमाणपत्रे द्यावीत, आंदोलकांवरील सर्व संबंधित केसेस मागे घ्याव्यात सगे सोयरे अंमलबजावणी करावी, संस्थानांच्या (हैदराबाद, औंध, सातारा, मुंबई) गॅझेट्स लागू करावेत, सर्व जाती-धर्मातील मुलींना मोफत शिक्षण मिळावे या प्रमुख मागणीसाठी ते आंदोलन करीत असून प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना जरांगे पाटील म्हणाले की, मी मुंबईला जाताना विजयाचा आणि अंत्ययात्रेचा असे दोन रथ घेऊन जाणार आहे.

» पान २

# उष्णतेपासून वाचण्यासाठी रिक्षा चालकाचा देशी जुगाड

## चालकाने टपाला बोंद्री बांधून रिक्षा केला 'एसी'



**बीड । किसान न्युज**

सध्या वाढलेल्या उष्णतेमुळे अंगाची लाही लाही होत असून, प्रत्येक जण उष्णतेपासून बचाव करण्यासाठी प्रयत्न करीत आहे. यासाठी एका रिक्षा चालकाने स्वतः व प्रवाशांनाही उन्हाचा तडाखा जाणवू नये यासाठी रिक्षावर पोते बांधून एसीचा देशी जुगाड केला आहे. हा रिक्षा बीड कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक धनंजय गुंदेकर यांनी मोबाईलमध्ये कैद करुन फेसबुकवर शेअर केल्याने याची जोरदार चर्चा सुरू आहे. सध्या उन्हाचा चांगलाच तडाखा जाणवू लागला असून, तापमान ४२ अंशाच्या घरात गेला आहे. यामुळे दुपारच्या वेळी रस्त्यांवर शुकशुकाट दिसत आहे. या उष्णतेमुळे कालच परळी येथे एक ट्रक जळाल्याची घटना घडली आहे. पण काही लहान सहान व्यापारी, रिक्षा चालक, मालवाहतूक वाहन चालक यांना कोणत्याही परिस्थितीत घर चालविण्यासाठी काम करावे लागते. त्यात रिक्षा म्हटल्यावर तर

» पान २ वर

# प्राथमिक पदवीधर शिक्षकांचे उपोषण तात्पुरते स्थगित

## योगेश क्षीरसागरांची मध्यस्थी; ना.अजितदादांसमोर प्रश्न मांडण्याची ग्वाही




**बीड । किसान न्युज**

दि.३० : जिल्हा परिषदेमध्ये प्राथमिक पदवीधर, भाषा व सामाजिक शास्त्र विषयाच्या ७४ शिक्षकांनी गणित व विज्ञान विषयांत रूपांतर करण्याच्या मागणीसह इतर विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू होते. उपोषणस्थळी राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मंगळवारी (दि.२९) भेट देत शिक्षकांशी संवाद साधला. त्यांच्या यशस्वी मध्यस्थीमुळे उपोषण तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे. डॉ.योगेश क्षीरसागर यांनी म्हटले की, शिक्षकांच्या मागण्या न्याय्य असून त्या शासनाच्या निदर्शनास आणून दिल्या जातील. उपमुख्यमंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्यामार्फत शासनदरबारी पाठपुरावा करून या मागण्यांची योग्य ती दखल घेण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे

» पान २ वर

# दोन ठिकाणी छापा; साडेचार लाखांचा गुटखा पकडला

## बीड शहर पोलिसांची कारवाई; तिघांविरुद्ध गुन्हा दाखल



**बीड । किसान न्युज**

मध्यंतरी कारवाया थंड होताच पुन्हा गुटखा विक्री खरणाऱ्यांनी साठेबाजी सुरू केली होती. याची कुणकुण लागताच शहरातील हत्तीखाना आणि जुना बाजार परिसरात छापा टाकून ४ लाख ४७ हजार ९०९ रुपयांचा गुटखा पकडला आहे. ही कारवाई बीड शहर पोलिसांनी केली आहे. याप्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत हे बीड जिल्ह्यातील अवैध धंद्यांचे कर्दनकाळ ठरले आहेत. तर त्यांनी पदभार घेताच गुटखा कारवायांचा धडाका सुरू केला होता. यामुळे जिल्ह्यात गुटखा वापर थांबली होती. पोलिसांच्या कारवायाही काहीशा शांत झाल्या होत्या हे पाहून गुटखा विक्री करणाऱ्यांनी पुन्हा राज्यात बंदी असलेल्या

» पान २ वर

## सुट्टीची सूचना

**उद्या १ मे महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनाच्या निमित्ताने सायं दैनिक किसान कार्यालयाला सुट्टी असणार आहे. यामुळे आज गुरुवारी (दि.१) अंक प्रकाशित होणार नाही याची वाचक, जाहिरातदार यांनी नोंद घ्यावी.**

**-व्यवस्थापक**
**सायं.दैनिक किसान**

# घरकुल योजना मुदतवाढ

**बीड । किसान न्युज**

आवास प्लस २०२४ सर्वेक्षण करण्यासाठी दि. १५ मे २०२५ पर्यंत मुदतवाढ प्राप्त झाली आहे. यापुढे मिळण्याची शक्यता नाही. यामुळे प्रत्येक व्यक्तीने १० मे २०२५ च्या आत सर्व १००% पात्र बेघर व कच्ची घरे असलेल्या कुटुंबांचे सर्वेक्षण पूर्ण करुन घ्यावीत.

# उद्या कामगार कर्मचारी शेतकरी मिरवणुकीत सहभागी व्हा : मोराळे



**बीड । किसान न्युज**

दिवसेंदिवस कामगार कर्मचारी शिक्षक शेतकरी वंचित उपेक्षित वर्गाचे प्रश्न जटिल होत आहेत गेल्या तीन महिन्यात मराठवाड्यात २५९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत शिक्षण क्षेत्रात रोज नवा जीआर काढून राज्यकर्त्यांनी गोंधळ निर्माण केला आहे. शेतकरी कर्ज माफ करतो म्हणून खोटी आश्वासने देऊन सरकार राज्यात आले मात्र आता शेतकरी कर्ज माफ करता येणार नाही असे जाहीर करून टाकले. लाडकी बहीण योजना गुंडाळण्याची तयारी सुरू आहे जवळपास दहा लाख लाडक्या बहिणींना या ना त्या कारणामुळे लाभ नाकारला आहे कामगार म्हणून मान्यता मिळण्यासाठी ग्रामसेवकांचा दाखला मिळत नाही.५२००० शिपाई प्रवर्गाची पदे व्यापगत केली आहेत. नौकऱ्यांचे कंत्राटीकरण सुरू आहे. या सर्व प्रश्नांची उत्तरे देण्यास सरकार टाळा-टाळ करत आहे. संघटित शक्ती दाखवून सरकारला वटणीवर आणण्यासाठी सर्व क्षेत्रातील कामगार कर्मचारी शेतकरी कष्टकऱ्यांनी दिनांक १ मे जागतिक कामगार दिनाच्या मिरवणुकीत सहभागी व्हावे असे आव्हान किसान संघर्ष समितीच्या प्रा सुशिलाताई मोराळे यांनी केले आहे.

## जिल्हा क्रीडा संकुल स्टेडियम येथे

# अंडर १४ बॉईज मालिका फुटबॉल स्पर्धेसाठी निवड चाचणी

**बीड । किसान न्युज**

वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन महाराष्ट्र रोजी under १४ पुरूष फुटबॉल स्पर्धा शिरपुर येथील आयोजित करण्यात आलेल्या असून या स्पर्धेत बीड जिल्हा वरिष्ठ फुटबॉल संघ सहभाग घेणार असून. यासाठी दि. ०५/०५/२०२५ मे सोमवर रोजी जिल्हा क्रीडा संकुल स्टेडियम येथे जिल्हा निवड चाचणी होणार आहे, यातुनच जिल्ह्याचा संघ निवडला जाणार आहे सदरील स्पर्धेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या खेळाडूंनी ०५/०५/२०२५ मे रोजी दुपारी ०४ वाजता किट मध्ये जिल्हा क्रीडा संकुल स्टेडियम बीड येथे उपस्थित रहावे, सदरील स्पर्धेसाठी निवड समिती गठित करण्यात आलेली असून निवड समिती अध्यक्ष म्हणून शेख आमेर कादरी शेख जफर गुडडू सर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभाग घ्यावे, असे आवाहन बीड जिल्हा फुटबॉल संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे अधिक माहितीसाठी संपर्क साधावा. १. ९८६०१०१२६३ २. ९०२८५६५५६५ निवड चाचणी दिनांक: २६ फेब्रुवारी २०२५ स्थळ: जिल्हा क्रीडा संकुल बीड वेळ: दुपारी ०४: वाजता प्रवेश फिस: नाही. नोट: खेळाडूंनी सोबत आधार कार्ड, जन्म प्रमाणपत्र व कीट घेऊन येणे तसेच CRS करणे बंधनकारक आहे



# बीड विधानसभेतील मंडळ अध्यक्षांचा सलीम जहाँगीर यांच्या वतीने सत्कार

**बीड । किसान न्युज**

भाजप नेत्या तथा राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली बीड विधानसभा मतदारसंघातील भाजप मंडळ अध्यक्षांचा निवडी जाहीर करण्यात आल्या आहेत. भाजपचे कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी अशोक लोढा, मनोज पाटील,अशोक रसाळ यांच्या निवडी जाहीर केल्या. त्या अनुषंगाने भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेश महामंत्री सलीम जहाँगीर यांनी नवनियुक्त शिलेदारांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. भाजपचे कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण आणि लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांनी बीड विधानसभा मतदारसंघातील बीड शहर मंडळ अध्यक्षपदी अशोक लोढा, तालुका मंडळ अध्यक्षपदी मनोज पाटील, अशोक रसाळ यांची नियुक्ती जाहीर केली आहे. भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेश महामंत्री सलीम जहाँगीर यांच्या निवासस्थानी झालेल्या कार्यक्रमात मंडळ अध्यक्ष अशोक लोढा, मनोज पाटील , अशोक रसाळ यांच्या हृदय सत्कार करण्यात आला. यावेळी मंत्री बँकेचे बँकेचे चेअरमन आदित्यसेठ सारडा,जिल्हा संघटक महामंत्री प्रा. देविदास नागरगोजे सर, जिल्हा कोषाध्यक्ष चंद्रकांत बप्पा फड, भाजप नेते उज्वलसेठ कोटेचा, नूरलाला खान , वामन मुंडे यांच्यासह सर्व पदाधिकारी उपस्थित होते.